**Ulhasnagar Municipal Corporation**
**उल्हासनगर महानगरपालिका**
जा. क्र. : उ.म.पा./आ.का./८३/१६
महानगरपालिका आयुक्त यांचे कार्यालय
उल्हासनगर - ४२१ ००३, जिल्हा : ठाणे
कार्यालय : २७२०१०५ फॅक्स : ०२५१-२७२०१०४
दिनांक : २८ डिसेंबर, २०१६

राजेंद्र निंबाळकर.
भा.प्र.से.
**आयुक्त**

प्रति,
मा. सदस्य/मा.सदस्या श्री/श्रीम..................................
उल्हासनगर महानगरपालिका,
उल्हासनगर

**विषय : सन २०१६-१७ आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची प्रभागनिहाय थकबाकी वसूलीच्या कामामध्ये नागरिकांना आवाहन करणेबाबत...**

**संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/आ.का./५३/२०१६ दि. २९/११/१६**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविणेत येते की,महापालिकेच्या हद्दीतील मालमत्तांची थकबाकी रु. ३६० कोटी एवढी असून, सदरची थकबाकी वसुलीची कार्यवाही महानगरपालिका प्रशासनाकडून सुरु आहे, अद्यापपर्यंत सन २०१६-१७ एकुण रु. ७१ कोटी एवढीच वसूली झाली आहे, महानगरपालिकेकडून मोठया प्रमाणात मालमत्ता कराची थकबाकी वसूली करिता मालमत्ता सिलबंद करणे व लिलावाची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

आपल्या प्रभागातील विकासकामे करण्याकरिता निधी उपलब्ध असणे आवश्यक आहे व त्यासाठी चालू आर्थिक वर्षातील महानगरपालिकेचे उत्पन्न विचारात घेता, मालमत्ता कराची परिणामकारक वसूली होणे अत्यंत गरजेचे आहे. सद्यस्थितीत मालमत्ता कर हेच महापालिकेचे उत्पन्नाचे एकमेव महत्वाचे साधन आहे.

तरी आपल्या प्रभागातील मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या नागरिकांना (रहिवाश्यांना) मालमत्ता कर भरण्यास आवाहन करावे. यापूर्वी वरील संदर्भिय पत्राव्दारे आपणांस शहरातील सर्व थकबाकीदारांच्या वसुलीबाबतची प्रभागनिहाय माहिती देण्यात आली होती. तसेच आपल्या प्रभागातील तसेच शहरातील अन्य सर्व प्रभागातील मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या सर्व मालमत्ता धारकांची संगणकीकृत माहिती (Softcopy) नागरिक सुविधा केंद्र, महापालिका मुख्यालय येथे उपलब्ध असून, ती आपण अथवा आपले प्रतिनिधी मार्फत नागरिक सुविधा केंद्रातून प्राप्त करुन घेवून मालमत्ता कराचे वसुलीमध्ये आपण सक्रीय सहभाग घ्यावा, ही विनंती.

28.12.2016

(राजेंद्र निंबाळकर)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका